# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्र.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय** - अहमदनगर जिल्हयातील सार्वजनिक ठिकाणी व धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी निर्देशांचे उल्लंघन करण्या-या व्यक्तींवर कारवाई करणेबाबत...

**वाचावे** -

1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. महाराष्ट्र पोलीस अधिनियम - कलम 43
4. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची अधिसूचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य5दि.14/03/2020
5. या कार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या 9ब/1869/2020 दि.30/10/2020
6. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.कोरोना2020/प्र.क्र.110/आरोग्य5 दि.29/05/2020
7. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. 118-1/कोव्हीड -19/दंडात्मक कारवाई/7629/2020, दि.07/10/2020
8. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु/कार्या 19अ/1871/2020 दि.11/10/2020
9. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.डीएमयू/2020/सीआर.92/डीआयएसएम-1, दि.14/11/2020
10. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/7849/2020, दि. 17/11/2020.
11. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/7852/2020, दि. 17/11/2020.
12. या कार्यालयाकडील आदेश क्र. आव्यमपु/कार्या 19अ/1919/2020, दि.17/11/2020.
13. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/8135/2020, दि.30/11/2020.
14. या कार्यालयाकडील आदेश क्र. आव्यमपु/कार्या 19अ/1930/2020, दि.01/12/2020.
15. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/8086/2020, दि.28/12/2020.
16. या कार्यालयाकडील आदेश क्र. आव्यमपु/कार्या 19अ/2137/2020, दि.31/12/2020.
17. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/862/2021, दि.01/02/2021.
18. या कार्यालयाकडील आदेश क्र. आव्यमपु/कार्या 19अ/135/2021, दि.01/02/2021.
19. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. जिविशा/कोव्हीड-19/दंडात्मक कारवाई/1492/2021, दि.25/02/2021.

| क्र.आव्यमपु/कार्या 19अ/ २०९ /2021 | **आदेश** | अहमदनगर दिनांक २८ /02/2021 |
|---|---|---|

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र

पोलीस अधिनियम कलम 43(1) अन्वये जिल्हादंडाधिकारी यांना जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी यात्रेमुळे, जत्रेमुळे किंवा तशा दुस-या प्रसंगामुळे मोठा जनसमुदाय जमण्याचा संभव असून त्याठिकाणी साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होऊ नये म्हणून त्यास आवश्यक वाटतील अशा विशेष उपाययोजना करता येतील.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.9 अन्वये राज्य शासनाने राज्यातील धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळे भाविकांच्या दर्शनासाठी सोमवार दि.16/11/2020 पासून खुली करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने कोविड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे तसेच आगामी कालावधीतील संभाव्य कोविड 19-विषाणू संसर्गाची दुसरी लाट विचारात घेता त्यासाठी अहमदनगर जिल्हयातील सार्वजनिक ठिकाणी व धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी कोविड प्रतिबंधात्मक विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.18 चे आदेशान्वये अहमदनगर जिल्हयातील धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी व सार्वजनिक ठिकाणी मास्क/रुमाल वापरणे व सोशल डिस्टन्सिंग (सामाजिक अंतर) पाळणे, सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या परिसरात न थुंकणे, धुम्रपान न करणे याचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरुध्द रु. 100/- इतकी भरपाई रक्कम व फी आकारणे व वसुल करणेबाबत अहमदनगर जिल्हयातील पोलीस आस्थापनेवरील पोलीस नाईक ते पोलीस निरीक्षक या दर्जाचे पोलीस अंमलदार यांना दि.01/02/2021 ते दि.28/02/2021 पावेतो प्राधिकृत करण्यात आलेले होते.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 19 अन्वये अहमदनगर जिल्हयातील पोलीस आस्थापनेवरील पोलीस नाईक ते पोलीस निरिक्षक या दर्जाचे पोलीस अंमलदार यांना संदर्भ क्र.16 अन्वये दिलेले दंडात्मक कारवाईचे अधिकार दि. 01/03/2021 पासून रक्कम रु. 500/- प्रमाणे दंड आकारणीची कारवाई यापुढेही सुरु ठेवणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 43(1) मधील तरतुदीनुसार विशेष उपाययोजनांतर्गत, अहमदनगर जिल्हयातील सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी कोविड-19 विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक ठिकाणच्या रहिवाशांनी आणि धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी येत असलेल्या किंवा परत जात असलेल्या व्यक्तीने चेह-यावर मास्क/रुमाल वापरणे, सोशल डिस्टन्सिंग (सामाजिक अंतर) पाळणे व सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या परिसरात धुम्रपान न करणे व न थुंकणेबाबत या जाहीर नोटीसव्दारे निर्देश करुन फर्मावित आहे.

जिल्हयातील धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ठिकाणी व सार्वजनिक ठिकाणी मास्क/रुमाल वापरणे व सोशल डिस्टन्सिंग (सामाजिक अंतर) पाळणे, सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या परिसरात न थुंकणे, धुम्रपान न करणे, याचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरुध्द रु. 500/- इतकी भरपाई रक्कम व फी आकारणे व वसुल करणेबाबत अहमदनगर जिल्हयातील पोलीस आस्थापनेवरील पोलीस नाईक ते पोलीस निरीक्षक या दर्जाचे पोलीस अंमलदार यांना दि.01/03/2021 ते दि.31/03/2021 पावेतो प्राधिकृत करण्यात येत आहे.

पोलीस प्रशासनाने धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या प्रशासनाच्या मदतीने मास्क/रुमाल वापरणे व सोशल डिस्टन्सिंग (सामाजिक अंतर) पाळणे, सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या परिसरात धुम्रपान न करणे व न थुंकणे याचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरुध्द उपरोक्त प्रमाणे कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयास सादर करावा.

तसेच अहमदनगर जिल्हयातील धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ट्रस्ट/आस्थापना/बोर्ड यांना कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखणेकामी दर्शन व्यवस्था, सोशल डिस्टन्सिंगसह रांगाचे नियोजन, गर्दीचे व्यवस्थापन, धार्मिक/प्रार्थना स्थळांचे निर्जंतुकीकरण तसेच भाविकांसाठी सॅनिटायझरची उपलब्धता, थर्मल स्कॅनिंग व पल्स ऑक्सीमीटर द्वारे तपासणी व्यवस्था इ. आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणेबाबत निर्देश देत आहे. सदर धार्मिक/प्रार्थना स्थळांच्या ट्रस्ट/आस्थापना/बोर्ड यांनी सदरचे निर्देशाचे पालन न केल्यास व स्वच्छता व सुव्यवस्था राखण्याची व्यवस्था न केल्यास त्यापोटी लागणारा खर्च संबंधीतांवर बसविण्यात येईल व सदर खर्च वसुल केला जाईल याबाबतची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी अहमदनगर
सत्यमेव जयते
अहमदनगर

स्वाक्षरी /--
**(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

**प्रति,**

1. जिल्हा पोलीस अधीक्षक, अहमदनगर
2. ट्रस्ट/बोर्ड/आस्थापना, सर्व **धार्मिक/प्रार्थना स्थळे** अहमदनगर जिल्हा

प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळ, अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत - आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत - जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व प्रसिध्दीसाठी.
प्रत - उपविभागीय अधिकारी (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहिती व नियतकालिक तपासणीसाठी
प्रत - तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत - मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपंचायत (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**अहमदनगर**